# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

☎ २५६५६२३४, फॅक्स २५६५६२३४, E-mail : jdtepu@pn3.vsnl.net.in

जा.क्र.विकापु/आस्था-२/जाहिरातीस मान्यता/ ८०३ दिनांक: 5 FEB 2010

प्रति,
सर्व शासकीय अनुदानित/विनाअनुदानित
अभियांत्रिकी/औषध निमा्रण शास्त्र/महाविद्यालये व
तंत्रनिकेतने व तत्सम संस्था.

विषय:- शिक्षकीय पदे भरण्याच्या जाहिरातीस मंजूरी मिळणेबाबत..
संदर्भ:- मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक:-
(१) १०/एनजीपी/जाहिरात मान्यता/२००९/१८२७२, दि. १९ डिसेंबर २००९.
(२) १०/एनजीपी/मान्यता/२००७/६८३, दिनांक २-११-२००७.

उपरोक्त मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या संदर्भिय पत्रच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, शिक्षकीय पदे भरण्याच्या जाहिरातीस मंजूरी मिळणेबाबत या कार्यालयास प्रस्ताव सादर करण्यापूर्वी शासकीय नियमानुसार खालील अटींची पूर्तता करुन प्रस्ताव सहसंचालक विभागीय कार्यालय यांचेकडे सादर करण्यांत यावेत.

(१) शिक्षक वर्गातील पदे भरण्यासाठी जी जाहिरात दिली जाते त्या मध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव अखिल भरतीय तंत्र शिक्षण परिषद व राज्य शासनाने मंजूर केलेल्या सेवाप्रवेश नियमाप्रमाणे असली पाहिजे याची दक्षता घेण्यांत यावी.

(२) मागास वर्गीय कर्मचा-यांची पदे जाहिरातीत दर्शविण्यापूर्वी बिंदूनामावली विभागीय आयुक्त मागासवर्गीय कक्ष यांच्याकडून तपासून व प्रमाणीत करुन घ्यावी व त्या नुसार जाहिरातीमध्ये पदे दर्शविण्यांत यावीत.

(३) वरील क्रमांक १ व २ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करुन जाहिरातीस मंजूरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.

(४) सुलभ संदर्भासाठी मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय मुंबई यांचे संदर्भीय क्रमांक ३ चे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे ते पहावे. त्याचा अभ्यास करुन त्यानुसार जाहिरातीस मान्यता घेण्याचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यांत यावेत.

(डी. एन. शिंगाडे )
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे-१६.

प्रत:- (१) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना माहितीसाठी सादर.
(२) श्री. शिंदे प्रोग्रॅमर यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी. त्यांना कळविण्यांत येते की, उपरोक्त पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यांत यावे.